दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक १०८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● सोमवार दि.१२ जुलै २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# केंद्र सरकारच्या इंधन दरवाढीविरोधात पनवेलमध्ये निदर्शने

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने केंद्रातील भाजपा सरकारच्या इंधन दरवाढ व जीवनावश्यक वस्तूंच्या भाववाढीच्या विरोधात काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या सूचनेनुसार कळंबोली ब्लॉक शहर काँग्रेसच्यावतीने के एल २ मध्ये काँग्रेस महिला पदाधिकारी यांनी चुलीवर जेवण बनवून गॅसचा रिकामा बाटला उलटा ठेवून निषेध नोंदवला व उपस्थित पदाधिकारी यांनी भाजपाच्या निष्क्रिय कारभाराच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.**



यावेळी पनवेल जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष सुदाम पाटील, पनवेल जिल्हा काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षा शशिकला सिह, जिल्हा उपाध्यक्ष संतोष चिखलकर, जयश्री खटकल, रामचंद्र पाटील, जयेश लोखंडे, सुभाष गायकवाड, अरुण ठाकूर, रमेश राव, रोहित पाटील, भागवत पाटील, नरेश कुमारिका, कलावती माळी, शिल्पा घोरपडे, सुनीता माळी, आरती पोतदार, सुरेश खोसे, भावना सिंग, विलास मागाडे, चेतन घोडके, प्रतीक मोदी, संजय विटेकर, अनिल सुर्यवंशी, शौकत खान, बाळू खरजे, आशादेवी, सविता सावंत, सती भिडे, प्रमिला कुमारी देवी, सपना दास, अरुण पालकर, राणी मॅडम, अनिता दळवी, सिंधू सिंग यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

वाढत्या पेट्रोल-डिझेल आणि घरगुती गॅसच्या दरवाढीविरोधात काँग्रेसने दंड थोपटले आहे. काँग्रेस इंधन दरवाढीच्या विरोधात राज्यव्यापी आंदोलन सुरू केले आहे. राज्यातील १ हजार ठिकाणी हे आंदोलन करण्याचा मानस करण्यात आला आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी नुकतेच प्रसिद्धी माध्यमांसमोर बोलताना सांगितले की, काँग्रेसच्या आंदोलनात केंद्रातील मोदी सरकारने पेट्रोल, डिझेल व एलपीजी गॅसच्या किंमती भरमसाठ वाढवल्या आहेत. पेट्रोलने १०० रुपये लिटरचा टप्पा पार केला असून डिझेल ९२ रुपये लिटर झाले आहे. ही भाववाढ अशीच चालू राहिली तर डिझेल १०० रुपये लिटर होण्यास फार दिवस लागणार नाही. स्वयंपाकाचा गॅसही ९०० रुपये झाला आहे. या महागाईमुळे लोकांचे जगणे कठीण झाले. आधीच कोरोनाच्या संकटाने जनता त्रस्त आहे. त्यात महागाईचा मार सहन करावा लागत आहेत. मोदी सरकारच्या या अन्यायी दरवाढीविरोधात ७ जून पासून राज्यव्यापी आंदोलन सुरू झाले आहे.

यूपीए सरकार असताना पेट्रोलवर एक्साईज ड्युटी ९.४८ रुपये होती. ती आज ३२.९० रुपये म्हणजे २५८ टक्के आहे. तर डिझेलवर ३.५६ रुपये होती. ती आज ३१.८० रुपये आहे, म्हणजे ८२० टक्के वाढ आहे. या एक्साईज ड्युटीतून मोदी सरकारने गेल्या ७ वर्षात तब्बल २० ते २५ लाख कोटी रुपयांची लुटमार केली आहे. तसेच २००१ ते २०१४ या १४ वर्षाच्या काळात पेट्रोल-डिझेलवर प्रति लिटर १ रुपया सेंट्रल रोड फंड सेस लावला जात होता. २०१८ मध्ये तो १८ रुपये प्रतिलिटर केला. सध्या पेट्रोल आणि डिझेलवर प्रति लिटर १८ रुपये सेंट्रल रोड आणि इन्फ्रास्ट्रक्चर फंडासाठी घेतले जातात. तसेच पेट्रोलवर प्रति लिटर २.५० तर डिझेलवर प्रति लिटर ४ रुपये कृषी सेस घेतला जातो. या दरोडेखोरी विरोधात काँग्रेसच्यवतीने निदर्शने करण्यास सुरुवात करण्यात आली.

यूपीएचे सरकार असताना आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती १०० डॉलरपेक्षा जास्त प्रती बॅरल असतानाही देशांतर्गत किंमतीवर त्याचा परिमाण झाला नाही. सामान्य लोकांना दिलासा देण्याची भूमिका यूपीए सरकारने घेतली होती. आज आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती जवळपास ६४ डॉलर प्रति बॅरल एवढ्या कमी असतानाही पेट्रोल-डिझेलचे दर भरमसाठ वाढवलेले आहेत. मोदी सरकार हे सामान्य जनतेचे सरकार नसून ते फक्त मुठभर धनदांडग्या उद्योगपतींसाठी काम करणारे सरकार आहे, अशी टीकाही यावेळी काँग्रेस सरकारच्यावतीने करण्यात आली.

> हे आंदोलन नसून सर्वसामान्य नागरिकांना भूलथापांच्या आहारी घालणाऱ्या भाजपच्या नेत्यांना खडे बोल असले तरीही येथील नागरिकांना खरं आणि खोटं काय हे दर्शविणारे हे आंदोलन आहे. गेली अनेक वर्षे काँग्रेसने देशावर सत्ता केली आणि त्यावेळी जी आंदोलने करण्यात आली त्या आंदोलनाचा भाग तेव्हाची देश वाचविण्यासाठी असणारी भाववाढ आणि आज देश लुटणारी भाववाढ याचा जनतेने विचार केला पाहिजे. पैसा झाडाला उगवत नाही, अशी म्हण आहे. मग जनतेच्या हितासाठी आम्ही काँग्रेसवासी तेव्हाही लढलो आणि आताही लढतच आहोत, हे प्रामुख्याने लक्षात घेतले पाहिजे.
>
> **- सुदाम पाटील, कार्याध्यक्ष, पनवेल जिल्हा काँग्रेस कमिटी**

## संक्षिप्त...

### उत्तरप्रदेशमधून २ दहशतवाद्यांना अटक

**लखनऊ : वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशची राजधानी लखनऊच्या दुबग्गा रिंगरोडवरील सिते बिहार भागात अल कायदाच्या २ दहशतवाद्यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात स्फोटकं आणि शस्त्रास्त्र जप्त करण्यात आली आहेत. यूपी एटीएसच्या कारवाईबाबत राज्याचे अतिरिक्त पोलिस महासंचालक (कायदा आणि सुव्यवस्था ) प्रशांत कुमार यांनी माहिती दिली. यूपी एटीएसने दहशतवाद्यांच्या मोठ्या मॉड्यूलचा पर्दाफाश केला आहे. त्यांच्याकडून स्फोटकं आणि शस्त्रास्त्र जप्त केली आहेत. १५ ऑगस्टला स्वातंत्र्य दिनाला घातपात घडवून यूपी हादरवण्याचा त्यांचा कट होता, अशी माहिती प्रशांकत कुमार यांनी दिली.

अटक करण्यात आलेले दहशतवादी हे अल कायदाच्या अन्सार गझावत उल हिंदचे आहेत. लखनऊमध्ये अनेक ठिकाणी स्फोट घडवण्याचा त्यांचा कट होता. एवढचं नव्हे तर उत्तर प्रदेशातील अनेक शहरांमध्ये स्फोट घडण्यासाठी त्यांनी कट रचला होता. अटक करण्यात आलेल्या दहशतवाद्यांचा संबंधांचे पाकिस्तानशी असल्याचं समोर आलं आहे, असं त्यांनी सांगितलं.

मिनहाज अहमद, मसरुद्दीन अहमद नावाच्या दोन दहशतवाद्यांना अटक करण्यात आली आहे. मिनहाज अहमदच्या घरात स्फोटकं आढळली आहेत. दहशतवाद्यांना ताब्यात घेतलं असून त्यांची चौकशी सुरू आहे. त्यांच्या साथीदारांचा शोध सुरू आहे. दहशतवाद्यांचे काही साथीदार हे कानपूरमध्ये लपले असल्याची माहिती आहे, असं प्रशांत कुमार म्हणाले.

दहशतवादी कारवायांची सूत्रे पाकिस्तान-अफगाणिस्तानच्या सीमेवरील पेशावर-क्वेटा मधून हलवण्यात येत आहेत. हल्ल्यासाठी मिनहाज अहमद आणि मसीरुद्दीन यांची मोठी भूमिका होती. लखनऊ, कानपूरमधील साथीदारही यात सामिल आहेत, असं यूपीचे अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रशांत कुमार यांनी सांगितलं.

### मोठीजुई जमीन घोटाळा प्रकरणी....

# बोगस शेतकरी, दलाल व मंडळ अधिकाऱ्यासह तत्कालीन तहसिलदारांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील मौजे मोठीजुई येथील जमीन घोटाळा प्रकरणी बोगस शेतकरी, मध्यस्ती करणारे दलाल व उरणच्या तत्कालीन तहसिलदारांसह नऊ जणांवर उरण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उरण तालुक्यात मागील काही वर्षांपासून अनेक जमीन घोटाळे उघडकीस येत असून,या घोटाळ्यात येथील स्थानिक तरुण वर्ग पैशाच्या हव्यासापोटी गुरफटला जात असल्याचे समोर येत आहे.

उरण पोलिसांकडून मिळालेल्या वृत्तानुसार उरण तालुक्यातील मौजे मोठीजुई येथील एका तरुणाला पैशाचे अमिष दाखवून त्यांच्या नावाचा बोगस सातबारा तयार करण्यात आला. याशिवाय या १५२ गुंठे जमिनीचा सातबारा तयार करण्यात आलेल्या जमिनीची विक्री करून यातील फिर्यादी विकासक किसन धावजी राठोड यांना विक्री केली. मात्र सदर सातबारा वरील जमीन अस्तित्वात नसल्याने विकासकांनी संबंधितांना जमिनीची देण्यात आलेली रक्कम परत देण्यास पर्याय दिला.

मात्र जमिनीचा व्यवहार करून जमीन अस्तित्वात नसतांना त्यांची १ कोटी ८३ लाख रुपये एवढी रक्कम गेल्याने व व्यवहारात देण्यात आलेली रक्कम परत देण्यास टाळाटाळ केल्याने अखेर विकासक किसन राठोड यांनी पोलिस ठाण्यात धाव घेऊन मोठीजुई येथील तथाकथित शेतकरी, मध्यस्ती दलाल आणि उरणच्या तहसिलदार अशा नऊ जंणाविरोधात संगतमन करून फसवणूक झाल्याची फिर्याद दाखल केली आहे.

या प्रकरणी तथाकथित शेतकरी घन:शाम भोईर - मोठीजुई, दलाल संदेश भोईर -विंधणे, संग्राम घरत-धाकटी जुई, योगेश खारपाटील-चिरनेर, किशोर केणी - मोठेभोम, निलेश पवार, विनायक ताम्हणकर यांच्यासह मंडळ अधिकारी हुसेन सय्यद व उरणच्या तत्कालीन तहसिलदार कल्पना गोडे या ९ जणांनी संगतमन फसवणूक केल्या प्रकरणी उरण पोलिस ठाण्यात भा.द.वि. ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० - बी व ३४ कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी उरण पोलिस अधिक तपास करीत असून, गुन्ह्यातील फरार आरोपींचा शोध लवकरच घेऊन या टोळीचा जेरबंद करणार असल्याची माहिती उरणचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक रविंद्र बुधवंत यांनी दिली आहे.

सदर जमिन घोटाळ्याची खबर उरण तालुक्यात वाऱ्यासारखी पसरली असून, या बाबत सर्वत्र मोठ्या प्रमाणात खळबळ निर्माण झाली आहे. तर अन्य जमीन घोटाळे बाजांचे धाबे दणाणले आहेत.

# पोलीस कर्मचाऱ्यांच्या वारसांना बीडीडी चाळीत घरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

पोलीस दलातून सेवानिवृत्त झालेले अथवा दिवंगत पोलीस कर्मचाऱ्यांच्या वारसांना मुंबईतील बीडीडी चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पात कायमस्वरूपी घरे देण्याच्या दृष्टीने उपाययोजना सूचविण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड हे समितीचे अध्यक्ष तर गृहमंत्री दिलीप वळसे पाटील हे सहअध्यक्ष असतील.

या चाळींमध्ये पोलीस कर्मचाऱ्यांना दिलेली घरे त्वरित रिकामी करून सेवानिवृत्त व दिवंगत पोलीस कर्मचाऱ्यांच्या वारसांना कायमस्वरूपी घरे कशी देता येतील यासाठी ही समिती शासनाला उपाययोजना सुचवेल. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुंबईतील वरळी, नायगांव, ना. म. जोशी मार्ग, शिवडी येथील बीडीडी चाळींचा पुनर्विकास जलद गतीने होण्याच्या दृष्टीने घेतलेल्या आढावा बैठकीत सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी तसेच दिवंगत पोलिसांच्या वारसांना कायमस्वरूपी घरे उपलब्ध करून देण्याबाबत सूचना केली होती.

समितीत पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे, गृहनिर्माण .../२

# श्री धावीर महाराजांच्या नवीन पालखीचे विधिवत पूजन



**दै.रायगड नगरी । रोहा**

रोह्याचे ग्रामदैवत व जागृत देवस्थान श्री धावीर महाराजांची नवीन चांदीची पालखी बनविण्यात आली आहे. या पालखीचे रविवारी विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी विश्वस्त आणि कार्यकारी मंडळाचे मोजकेच पदाधिकारी मंदिरात उपस्थित होते.

श्री धावीर महाराज हे रोहेकरांचे श्रद्धास्थान आहेत, महाराजांसाठी नव्याने चांदीची पालखी बनविण्यात आली असून गेली काही महिने चांदीची पालखी बनविण्याचे काम सुरू होते. तरी पालखी पूजनाचा कार्यक्रम भव्यदिव्य .../२

# नगरसेवक ज्ञानेश्वर पाटील यांच्या गाडीची तोडफोड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेचे महाविकास आघाडीचे नगरसेवक ज्ञानेश्वर पाटील यांच्या गाडीवर तिघांनी हल्ला करून त्यांच्या गाडीची तोडफोड केली आहे. तसेच गाडीत असलेली रोखरक्कम व सोन्याची चेन असा जवळपास २,२०,००० रुपयांचा ऐवज चोरीस गेल्याची तक्रार तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. नगरसेवक ज्ञानेश्वर पाटील हे शनिवारी रात्री ९ वाजता त्यांच्या घरी घोट गाव येथे इन्होव्हा या गाडीने जात असताना लहू निघुकर यांच्या घरासमोर त्यांची गाडी आली असता घोट गावातील तीन इसमांनी त्यांना शिवीगाळी व दमदाटी करून त्यांच्या हातातील दांडक्याने इनोव्हा गाडीच्या काचा फोडून डिक्कीत कापडी पिशवीत ठेवलेली रोखरक्कम व सोन्याचे दागिने असा ऐवज चोरीस गेल्याची तक्रार तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# शक्य होतील तितक्या निवडणूका महाविकास आघाडी एकत्र लढणार : ना.बाळासाहेब थोरात

**अहमदनगर : वृत्तसंस्था**



आघाडी सरकारमधील तिन्ही पक्ष एकत्र निवडणूक लढवणार की स्वबळावर, या मुद्द्यावर काँग्रेसचे नेते आणि महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी आपली भूमिका मांडली आहे. शक्य होईल तितक्या निवडणुका आम्ही एकत्रित लढणार आहोत, असे थोरात यांनी म्हटले आहे. थोरात यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी त्यांनी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. आघाडीतील तिन्ही पक्षांना आपापले पक्ष वाढवण्याची गरज आहे. प्रत्येकाला तो अधिकार आहे. त्या दृष्टीने आम्ही .../२

# कर्जत तालुक्यात शिवसेनेला खिंडार ; महादेव ऐनकर यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**दै.रायगड नगरी । कर्जत**



रायगडचे भाग्यविधाते तथा खासदार आदरणीय सुनील तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन खांडस गावचे शिवसेनेचे शाखाप्रमुख महादेव गणपत ऐनकर यांचा माजी आमदार तथा जिल्हाध्यक्ष सुरेशभाऊ लाड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहिर प्रवेश झाल्याने शिवसेनेच्या खांडस बालेकिल्ल्यात खिंडार पडल्याची चर्चा कर्जतमध्ये होत आहे. कर्जत तालुक्यातील खांडस प्रभाग हा शिवसेनेचा बालेकिल्ला समजला जातो.

या भागात विधानसभेच्या निवडणुकीत माजी आमदार सुरेशभाऊ लाड यांना कमी प्रमाणात मते मिळाली होती , म्हणूनच या भागात त्यांनी जास्त लक्ष केंद्रीत केले असल्याचे दिसण्यात येते. त्यातच आज खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त खांडस गावचे शिवसेनेचे शाखाप्रमुख महादेव गणपत ऐनकर यांचा पक्षप्रवेश करून शिवसेनेला तालुक्यात विचार करण्यास लावून बुरुज ढासळला आहे.

त्याप्रसंगी माजी आमदार सुरेशभाऊ लाड, कर्जत नगर परिषदेचे नगरसेवक शरदभाऊ लाड, .../२

# खांदा कॉलनी पाणी प्रश्नांवर १५ जुलैला सिडकोवर शेकापचा हंडा मोर्चा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शेकापचे पनवेल महानगरपालिका जिल्हा कार्याध्यक्ष महादेव वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली सिडको नवीन पनवेल कार्यालयावर हंडा मोर्चा होणार आहे.

गेल्या महिन्याभरा पासून खांदा कॉलनीतिल नागरिकांना मुबलक पाणी मिळत नाही, अनियमितता व कमी दाबाने पाणी येत आहे, सोसायट्यांना पाण्याचे टँकर विकत घ्यावे लागत आहेत काही सोसायट्यांना पाणी पूरवठाच होत नाही, तसेच तीस वर्षापासूनची जुनी झालेली पाईपलाईन बदलावी शेकापचे पनवेल महानगरपालिका जिल्हा कार्याध्यक्ष यांनी खांदा कॉलनीतील पाणी समस्या बाबत आक्रमक भूमिका घेत निवेदन देण्यासाठी सिडकोला वाघमारे यांचे शिष्टमंडळ गेले असता सिडको अधिकारी जागेवर नसल्याने अधिकाऱ्याचा केबिन ला निवेदन चिटकवले होते.

याबाबत शनिवार दि १० जुलै २०२१ रोजी सिडको पाणीपुरवठा अधिकारी यांनी खांदा कॉलनी ला भेट देऊन पाणी पुरवठा सुरळीत करणार आहेत असे आश्वासन दिले आहे यावेळी माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील पनप, नगरसेविका पमपा सौ कुसुम पाटील, शेकापचे पनवेल महापालिका कार्याध्यक्ष महादेव वाघमारे, अनिल बंडगर, किरण घरत, .../२

# स्वबळाची तुतारी

महाराष्ट्रातील ज्या नेत्यांना केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान मिळाले; त्यातून कोणता राजकीय संदेश जातो, हे लपून राहिलेले नाही. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे पक्षप्रमुखाच्या भूमिकेत शिरून जे बोलले आहेत, ते त्यांच्या विरोधकांइतकेच सरकारमध्ये मांडीला मांडी लावून बसलेल्या मित्रपक्षांसाठीही महत्त्वाचे आहे. मुख्यमंत्री म्हणून काम करताना उद्धव ठाकरे यांना पक्ष चालविण्यासाठी नेमका किती वेळ मिळतो आणि राज्यात सरकार आल्यानंतर राज्यभरातील शिवसैनिकांना नेमका काय कार्यक्रम देण्यात आला, या प्रश्नांची उत्तरे संदिग्ध होती. आता ओबीसी प्रवर्गासाठी आरक्षण नसताना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचा प्रसंग येऊ शकतो. ओबीसी प्रवर्गात शिवसेनेने चांगले स्थान मिळवले आहे; त्यामुळे मुख्यमंत्री राज्यातल्या जिल्हा प्रमुखांशी बोलताना, 'निवडणुका डोळ्यासमोर ठेवूनच काम करू नका' असे म्हणाले असले, तरी त्यांनी 'स्वबळ वाढवा' हा जो आदेश पदाधिकाऱ्यांना दिला आहे, तो त्यांचे मंत्रिमंडळातील मित्रपक्षही लक्षात घेतल्यावाचून राहणार नाहीत. राज्यातील पाच जिल्ह्यांमधील पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुका सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे घ्याव्या लागणार होत्या. या जागांवरची ओबीसी निवडणूक रद्द होऊन, ती खुल्या प्रवर्गात होणार होती; मात्र आता राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अधिकारात ती तूर्त रद्द केली आहे. नाही तर, तेव्हाच राज्यातील तीन सत्ताधारी मित्रपक्ष निवडणुकीच्या रिंगणात परस्परांशी कसे वागतात, हे समजले असते. करोनामुळे होऊ न शकलेल्या अनेक महापालिकांच्या निवडणुकाही आता कधी होतात, हे पाहावे लागेल. पक्षप्रमुख म्हणून संवाद साधताना उद्धव ठाकरे यांनी पु. ल. देशपांडे यांचा किस्सा सांगितला. स्वातंत्र्य चळवळीत अटक करून घेणाऱ्या तरुणीने आपले दागिने अनोळखी तरुणाकडे दिले आणि घरी नेऊन देण्यास सांगितले. तिला हा विश्वास त्या तरुणाच्या अंगावर असणाऱ्या खादीच्या कपड्यांमुळे वाटला होता. हा किस्सा सांगून, ठाकरे यांनी असाच विश्वास सामान्य नागरिकांना शिवसैनिकांबद्दल वाटला पाहिजे, असे सांगितले. ही अपेक्षा चांगली आहे आणि मुंबई व महाराष्ट्रातील शिवसैनिकावर नागरिकांची मदतीसाठी भिस्त असेही. आज या साऱ्या शिवसैनिकांसमोर राज्य सरकारने याबाबत काय आदर्श ठेवला आहे, हा जसा प्रश्न आहे; त्याचप्रमाणे, हे सरकार आल्यापासून 'आपण आता सत्ताधारी आहोत' अशी आश्वस्त जाणीव सगळ्या शिवसैनिकांमध्ये पुरती रुजली आहे का, अशीही शंका येते. १२ ते २४ जुलै या काळात राज्यभरात शिवसेना 'शिवसंपर्क अभियान' राबविणार आहे. शिवसेनेची संघटनात्मक बांधणी एकेकाळी फार बळकट होती आणि सत्ता व तदनुषंगिक लाभांचा काही स्पर्शच झालेला नसल्याने, सामान्य शिवसैनिक कायमच न्यायासाठी रस्त्यावर उतरायला तयार असे. उद्धव ठाकरे यांनी जी स्वबळाची तुतारी फुंकली, तिच्यातून राज्यभरातल्या दहा महापालिका, वीस नगर परिषदा आणि नगर पालिकांच्या निवडणुकांकडे निर्देश होतो आहे. ठरल्याप्रमाणे झाल्या, तर या साऱ्या निवडणुका फेब्रुवारीत होऊ शकतात. त्यासाठी आता फार वेळ उरलेला नाही. विशेष म्हणजे, या निवडणुका एकसदस्यीय प्रभाग या जुन्याच रचनेने होणार आहेत. काही दिवसांपूर्वी विधिमंडळाच्या अधिवेशनात जो भाजप आमदारांच्या निलंबनाचा प्रसंग घडला; त्यानंतर मुंबईसहित सर्वच महापालिकांच्या निवडणुकांमध्ये भाजप आणि शिवसेना यांचे काही सूत जुळेल, याची शक्यता दुरावली आहे. याशिवाय, नारायण राणे यांची शपथ आणि कृपाशंकर यांचा भाजपप्रवेश या घटनाही घडल्या आहेत. मुंबईतल्या गेल्या वेळच्या महापालिका निवडणुकीतच शिवसेना व भाजप यांचा अटीतटीचा संघर्ष झाला होता. त्याची पुनरावृत्ती होणार असेल, तर आत्ताच आपल्याला तयारीला लागायला हवे, अशी हाक उद्धव ठाकरे यांनी या संवादाच्या निमित्ताने घातली आहे. राज्यातल्या सगळ्यांच महापालिका शिवसेनेसाठी महत्त्वाच्या असल्या, तरी मुंबई महापालिकेचे महत्त्व अनेक अर्थांनी वेगळे आणि विशेष आहे. मुंबईत काँग्रेस किंवा राष्ट्रवादी काँग्रेस यांच्याशी आघाडी झाली नाही, तरी मुंबई महापालिका ताब्यात ठेवण्यासाठी शिवसेना त्यामुळेच आटोकाट प्रयत्न करील. ही निवडणूक होत असताना, राज्याची सत्ता ताब्यात असल्याचे आनुषंगिक फायदेही होतील. राज्यातल्या सर्व नेत्यांना ठाकरे यांनी जो पक्षविस्ताराचा कार्यक्रम दिला आणि प्रत्येक गावात शिवसेनेची शाखा असायला हवी, असे सांगितले, त्यावरून हे सरकार जमेल तितके दिवस टिकवत असतानाच, 'मित्रपक्षांविना राज्यात ताकद आजमावता येते का,' असाही विचार ते करीत असावेत. विधानसभेच्या निवडणुका अजून बऱ्याच दूर असल्या, तरी एका बाजूला भाजप आणि दुसरीकडे, तीन पक्ष हा असमतोल जागावाटपामध्ये नैसर्गिकपणे तिढा निर्माण करणारा आहे. तेव्हा मैदानातल्या शिवसैनिकांच्या मनातल्या साऱ्या शंका दूर करून 'स्वबळाचा नारा' देणे आवश्यकच होते. तेच मुख्यमंत्र्यांनी पक्षप्रमुख म्हणून केले आहे.

# विभागातील विकास कामे टप्प्या टप्प्याने मार्गी लावली जातील : आ.अनिकेत तटकरे

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

खा. सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त वाशी ग्रामपंचायतीच्यावतीने आंबा,नारळ झाडांची लागवड केली जात आहे. त्यामुळे प्रत्येकाच्या घरासमोर कल्पवृक्ष लागवड होत असताना त्याची निगा योग्यरीत्या राखणे ही आपली जबाबदारी असून खतांचे नियोजन सुध्दा करणे आवश्यक आहे. वाशी ग्रामपंचायतीच्यावतीने हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला आहे. त्याकाळी द.ग.तटकरे व भाईसाहेब पाशिलकर यांनी या भागाचा दुरदृष्टी ठेवून विकास साधल्याने या भागाचा चांगले विकास झाला आहे. ग्रामपंचायतीच्यावतीने अनेक विकास कामे करण्याची मागणी करण्यात आली आहेत. ही विकास कामे टप्प्या टप्प्याने मार्गी लावली जातील.यासह



पाणीपुरवठा योजना लवकरच मार्गी लावण्यात येईल.धाटाव औधोगिक क्षेत्रात भुमिपुत्राना न्याय देण्याची भुमिका आपण घेणार असल्याचे आ.अनिकेत तटकरे यांनी खा.सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त वाशी ग्रामपंचायतीच्यावतीने आयोजित वृक्षारोपण व ग्रामस्थांना आंबा व नारळ झाडांच्या वितरण प्रसंगी व्यक्त केले.

यावेळी राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे,जिल्हा कार्याध्यक्ष मधुकर पाटील, तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, जेष्ठनेते सुरेश मगर, शंकरराव भगत, माजी उपसभापती, अनिल भगत, अप्पा देशमुख, नगरसेवक महेंद्र गुजर, अहमद दर्जी, अन्सुल कंपनीचे अधिकारी शिरीष सातपुते, गिरीश हिरवे, किशोर तावडे, सरपंच वंदना वारगुडा, उपसरपंच अरविंद मगर, रामाशेठ म्हात्रे, दत्ता चव्हाण, ज्ञानेश्वर सांळुखे, अनंत मगर, सतिश भगत, ग्रामसेविका अर्चना पाटील, वाशी ग्रा.सदस्य पांडुरंग हंबीर, हरिश्चंद्र मोरे, समिता भगत, दिपाली धामणसे, अंतोष शिर्के, मनाली मगर, समिधा सुतार, रमेश बर्डे, रमेश जोगडे, अनंत जंगम, मनोहर जंगम, राकेश गुरव, अशोक निकम, वैभव घाणेकर, महेश बामुगडे, संदीप मगर, प्रकाश भगत, प्रशांत चितळकर, चंद्रकांत भगत, अशोक भोईर, प्रजोत गुरव, लक्ष्मण रटाटे, नथुराम मगर, लक्ष्मण जंगम, रामचंद्र मगर, परशुराम भगत, विलास भगत आदी उपस्थित होते.

यावेळी सुरेश मगर यांनी कोकणाला विकास निधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध करत रायगडसह कोकणाचा विकास खा.सुनील तटकरे यांनी साधला आहे. महाराष्ट्रभर लोकाभिमुख कामांच्या माध्यमातून खा.सुनील तटकरे यांचा झंझावात सुरू आहे. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत आ.अनिकेत तटकरे यांचे चांगले काम चालु असल्याचे सांगितले. या कार्यक्रमासाठी अंशुल कंपनीने नारळाची व सुदर्शन कंपनीने आंब्याची झाडे उपलब्ध करून दिली आहेत. हा कार्यक्रम सुरेश मगर यांच्या मार्गदर्शनाखाली सरपंच वंदना वारगुडा, उपसरपंच अरविंद मगर यांच्यासह ग्रा.सदस्य, ग्रामस्थ यांनी यशस्वीपणे पार पाडला.

## नावात बदल

माझे जुने नाव कु.रशिका शोईब रईस असे होते. यापुढे नवीन नाव सौ.रशिका जियाद अहमद डोलारे असे राहील. सदरची नावाची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र क्रमांक M-2129711 ह्यात नोंद आहे.

**नवीन नावाने सही/-**
**सौ.रशिका जियाद अहमद डोलारे**
**रा.हाऊस नं.४१८, भुसार मोहल्ला,**
**पनवेल-रायगड-४१०२०६**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे : गोंडाळे, तालुका : सुधागड, जिल्हा : रायगड येथील खालील नमूद केलेली मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालकाकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व सदर विद्यमान मालकांनी जाहीर नोटीस देण्यात संमती दिली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**सर्व्हे नं.११६ एकूण क्षेत्र-हे.आर.२-३९-०० पो.ख.0-00-00 एकूण आकार 00 रु.८२ पैसे मौजे : गोंडाळे, तालुका : सुधागड जिल्हा : रायगड**
**विद्यमान मालकाचे नाव : श्री.रामकिशोर रामवल्लभ बुब**

तरी सदर मिळकत बाबत हस्तांतरण, देवाण-घेवाण, गहाण, विश्वस्त, संस्था, वारसा भाडेकरार, ताबा, खरेदीखत, साठेखत, सामंजस्य करार, बक्षिस, मृत्यूपत्र, वाटप पत्र व इतर कोणत्याही स्वरुपाचा हक्क असल्यास अगर कोणत्याही स्वरुपाचा हितसंबंध असल्यास, त्याचा पृष्ट्यार्थ सर्व कागद, दस्त ऐवज पुराव्यासह खालील कार्यालयीन पत्यावर व कार्यालयीन वेळेत सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आंत सुचित करणे आवश्यक आहे. जर अशा प्रकारची कोणतीही हरकत कोणीही उपस्थित केली नाही तर सदर मिळकतीवर कोणाचाही कसलाही हितसंबंध राहणार नाही अथवा असलयास तो सोडून देण्यात आला आहे असे समजण्यात येईल. प्रस्तुतच्या मुदतीनंतर सदरच्या मिळकतीबाबत कोणाचीही व कसलीही हरकत आल्यास ती ग्राह्य धरली जाणार नाही व आमचे अशिल सदर मिळकतीचे कायदेशीर बाबींची पूर्ण पुर्तता करून आमचे अशिल सदर मिळकतीचे व्यवहार पूर्ण करतील, याची नोंद घ्यावी.

दि.१२/०७/२०२१

**सही/-**
**ॲड.सर्जील बिलाल शेख**
**वकील, उच्च न्यायालय**
**शॉप नं.१४, शुभ शरणम कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.२१,**
**सेक्टर १५, कामोठे, नवी मुंबई-४१०२०६**
**मो.नं.९२२३५५२८८८**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे : विंधणे, तालुका : उरण, जिल्हा : रायगड येथील खालील नमूद केलेली मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून कायम खरेदी खताने विकत घेण्याचे ठरविले आहे व सदर विद्यमान मालकांनी जाहीर नोटीस देण्यात संमती दिली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**सर्व्हे नं.२५९/१ एकूण क्षेत्र-हे.आर.१-४२-०० पो.ख.0-0७-४० एकूण आकार १६ रु.00 पैसे एकूण क्षेत्र, पैकी क्षेत्र 0-३६-00 हे.आर.**
**पॉ. मौजे : विंधणे, तालुका : उरण, जिल्हा : रायगड**

विद्यमान मालकाचे नाव १) छाया अंबाजी घरत, २) कासुबाई अंबाजी घरत, ३) दौलत माया घरत, ४) किशोर परशुराम घरत, ५) गीता परशुराम घरत, ६) रामुबाई परशुराम घरत, ७) शामकांत अंबाजी घरत, ८) मधुकर अंबाजी घरत, ९) शकुंतला रामदास जोशी, १०) जनाबाई हरिभाऊ नवाळे, ११) मुक्ताबाई बळीराम घरत, १२) अलका नवनीत म्हात्रे, १३) शारदा प्रल्हाद म्हात्रे, १४) प्रल्हाद गोपाळ घरत, १५) दशरथ गोपाळ घरत, १६) सुभाष गोपाळ घरत, १७) संदीप गोपाळ घरत, १८) अनसुया गोपाळ घरत.

तरी सदर मिळकत बाबत हस्तांतरण, देवाण-घेवाण, गहाण, विश्वस्त संस्था, वारसा भाडेकरार, ताबा, खरेदीखत, साठेखत, सामंजस्य करार, बक्षिस, मृत्यूपत्र, वाटप पत्र व इतर कोणत्याही स्वरुपाचा हक्क असल्यास अगर कोणत्याही स्वरुपाचा हितसंबंध असल्यास त्याचा पृष्ट्यार्थ सर्व कागद, दस्तऐवज पुराव्यासह खालील कार्यालयीन पत्यावर व कार्यालयीन वेळेत सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सुचित करणे आवश्यक आहे. जर अशा प्रकारची कोणतीही हरकत कोणीही उपस्थित केली नाही तर, सदर मिळकती वर कोणाचाही कसलाही हितसंबंध राहणार नाही, अथवा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असे समजण्यात येईल. प्रस्तुतच्या मुदतीनंतर सदरच्या मिळकतीबाबत कोणाचीही व कसलीही हरकत आल्यास ती ग्राह्य धरली जाणार नाही व आमचे अशिल सदर मिळकतीचे कायदेशीर बाबींची पुर्ण पुर्तता करून आमचे अशिल सदर मिळकतीचे व्यवहार पूर्ण करतील, याची नोंद घ्यावी.

दि.१२/०७/२०२१

**सही/-**
**ॲड.सर्जील बिलाल शेख**
**वकील, उच्च न्यायालय**
**शॉप नं.१४, शुभ शरणम कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.२१,**
**सेक्टर १५, कामोठे, नवी मुंबई-४१०२०६**
**मो.नं.९२२३५५२८८८**

# रायगड जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार संस्थाना वाली नाही ; रोजगार मिळत नसल्याने हतबल

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

शासनाने ऑक्टोबर २००० मध्ये रोजगार व स्वयंरोजगाराचे नवीन धोरण जाहिर केले त्या धोरणाचा एक भाग म्हणून बेरोजगार उमेदवारांच्या सेवा सोसायट्या स्थापन झाल्या आहेत. मात्र नोंदणी केल्यावर अनेक वर्षाचा कालावधी लोटून देखील सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्थांना रोजगार मिळालेला नाही. त्यामुळे अनेकांवर बेरोजगारीची कुर्हाड कोसळली आहे.

रायगड जिल्ह्यात सुशिक्षित बेरोजगारांच्या तब्बल १०९ सेवा सहकारी संस्था स्थापन झाल्या.या सेवा सोसायटयांना विना निविदा ५ लाखांपर्यंत कामे मिळावित यासाठी जिल्ह्यात जिल्हास्तरिय कामवाटप समिती अस्तित्वात येने अपेक्षित होते .या समितीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकरी अधिकारी हे अध्यक्ष असुन रोजगार व स्वयंरोजगाराचे सहाय्यक संचालक हे या समितीचे सचिव आहेत. त्याचप्रमाणे पीडब्ल्यूडी व जलसंपदाचे कार्यकारी अभियंता, जिल्हा सहकार उपनिबंधक हे या समितीचे सदस्य आहेत. मात्र जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवकांच्या प्रश्नांबद्दल जिल्ह्यातील एकही बडा अधिकारी गंभीर असल्याचे दिसून येत नाही. प्रशासनाच्या या उदासिन धोरणामुळे जिल्ह्यातील ६० ते ७० संस्था कागदावर उरल्या असल्याची प्राथमिक माहिती मिळत असुन केवळ ३० ते ४० संस्था कार्यरत असल्याचे समजते.

या सेवा सोसायट्यांमार्फत बेरोजगार उमेदवारांना स्वयंरोजगाराकडे वळवणे हा धोरणाचा मुख्य उद्देश होता. राज्य शासनांच्या आदेशान्वये अनेक युवकांनी सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था स्थापन केल्या. प्रत्येक संस्थेत ११ ते २१ पर्यंत सभासद आहेत. सहायक निबंधक कार्यालयातून रितसर नोंदणी करण्यात आली. बँकेत खाते उघडले, व आता सर्वांना रोजगार मिळेल व सुगीचे दिवस येतील असे वाटत होते. मात्र तसे काही होतांना दिसत नाही. सेवा सोसायटया कार्यरत होण्यासाठी व त्यांच्या बळकटीकरणासाठी विविध विभागांतर्गत येणारी कामे सेवा सोसायटयांना मिळावी याकरिता शासनाच्या विविध विभागांनी तब्बल २६ शासन निर्णय व परीपत्रकं काढून त्याप्रमाणे कामे देण्याबाबत आदेश निर्गमित केले. परंतू लाल फितीच्या कारभारामुळे या सोसायटयांना कामे मिळण्यास अडचणी येत आहेत.जिल्हा परीषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांनी काम वाटप समिती लवकरात लवकर स्थापन करून सेवा सोसाटयांना सुस्थितीत आणण्यासाठी प्रयत्न करावे हि मागणी संस्थाचे पदाधिकारी करत आहेत.

## ग्रामपंचायत सावळे
**ता.पनवेल, जि.रायगड**
**जाहीर सूचना सन २०२१-२२**

ग्रामपंचायत सावळे हद्दीतील व परिसरातील सर्व नागरिकांना /ठेकेदारांना कळविण्यात येते की, ग्रामपचांयत सावळेच्या ग्रामनिधीतून विविध विकास कामे करण्यासाठी शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर टेंडर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तरी त्यातील अटी व नियमास पात्र असणाऱ्या अधिकृत ठेकेदारांनी टेंडर भरण्यात यावी.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत सावळे**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पोलीस कर्मचाऱ्यांच्या वारसांना बीडीडी चाळीत घरे

राज्यमंत्री सतेज पाटील, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव, सह पोलीस आयुक्त (प्रशासन) मुंबई, मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास मंडळ हे या समितीचे सदस्य असतील. म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी समितीचे सदस्य सचिव असतील.

## श्री धावीर महाराजांच्या नवीन पालखीचे विधिवत पूजन

स्वरूपात करण्याचे भक्तगणांचे मानस होते. सध्या कोरोनाचे संकट आहे, शासनाने घालून दिलेल्या निर्देशांचे पालन करीत हा कार्यक्रम छोट्या स्वरूपात करण्यात आले. यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात ट्रस्टचे व उत्सव समितीचे काही मोजके पदाधिकारीच मंदिरात उपस्थित होते. रोहेकरांना हे अनमोल क्षण पाहता यावे आणि ग्रामदेवतेचे दर्शन घेता यावेयासाठी पालखी पूजनाचा कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण श्री धावीर महाराज की जय या फेसबुक पेजवर करण्यात आले होते.

## शक्य होतील तितक्या निवडणूका महाविकास आघाडी एकत्र लढणार

काम करतही असतो. यात काही चुकीचे आहे असे वाटत नाही. शिवसेने स्वबळाचा नारा दिला आहे असे मला कुठेही दिसत नाही, असे सांगतानाच शक्य होईल तितक्या निवडणुका आम्ही एकत्रित लढणार आहोत, असे थोरात यांनी स्पष्ट केले आहे.

विधानसभा अध्यक्षपदाबाबत सुरू असलेल्या चर्चेवर देखील त्यांनी भाष्य केले. शिवसेनेने विधानसभेच्या अध्यक्षपदावर दावा केलेला नाही. त्यामुळे विधानसभेच्या अध्यक्षपदासाठी काँग्रेसचाच उमेदवार असणार आहे, असे थोरात यांनी स्पष्ट केले. याबरोबरच वन खाते देखील रिक्त नाही. हे खाते मुख्यमंत्र्यांकडेच असल्याने कामाला चांगली गती आहे, असेही ते पुढे म्हणाले.

भाजप नेत्यांकडून होणाऱ्या मध्यावधी निवडणुकांच्या भाष्यावर प्रतिक्रिया व्यक्त करत त्यांनी विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीकास्त्र सोडले आहे. देवेंद्र फडणवीस यांना काही ना काही घोषणा करायची असते. पण त्यांची घोषणा कधी साकार होत नाही. मध्यावधी निवडणुका होणार नाहीत. दोन वर्ष आघाडी सरकार चालले आहे आणि आणखी तीन वर्षे हे सरकार पूर्ण करेल. इतकेच नाही तर राज्यात निवडणुकीनंतर पुन्हा आघाडी सरकार आले तर त्यात आश्चर्य वाटायला नको, असे सांगत त्यांनी पुन्हा राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार असल्याचे सूचित केले.

## कर्जत तालुक्यात शिवसेनेला खिंडार ; महादेव ऐनकर यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

कळंब पंचायत समितीचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष संतोष शांताराम पाटील, खांडस ग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच मंगळशेट जयवंत ऐनकर, जनार्दन अनंता ऐनकर, (सामाजिक कार्यकर्ते), विलास अनंता माळी (माजी सरपंच), पंढरीनाथ ऐनकर (उद्योजक), अंकुश ऐनकर (सदस्य ) सदानंद ऐनकर, बाळा भोईर, अरूण ऐनकर, दिलीप गायकवाड हे कार्यकर्ते उपस्थित होते. महादेव ऐनकर यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश झाल्याने पक्षाला येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत नक्कीच फायदा होईल , असे चित्र दिसत आहे.

## खांदा कॉलनी पाणी प्रश्नांवर १५ जुलैला सिडकोवर शेकापचा हंडा मोर्चा

मारुती शिर्के, नागेश शेट्टी, तसा शेकाप कडून त्यांचा पुस्पगुच्छ देऊन सत्कारही करण्यात आला पण जोपर्यंत खांदा कॉलनीला मिळत नाही मुबलक पाणी तोपर्यंत शेकापची सिडको विरोधात आणि बाणी असा पवित्रा शेकापचे पनवेल महानगरपालिका जिल्हा कार्याध्यक्ष महादेव वाघमारे यांनी घेतला आहे.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## सूचना क्र. १

साडेबावीस टक्के योजने अंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण "ना हरकत पत्र" मागणी अर्जानुसार सूचना

सर्व **श्री. / श्रीमती श्री. मनोहर गजानन भोईर राहणार - नवीन शेवा, उरण, श्रीमती शुभांगी महेंद्र घरत, श्री. महेंद्र तुकाराम घरत, श्री. कुणाल महेंद्र घरत, श्री. गुलाब तुकाराम घरत राहणार - शेलघर, ता. पनवेल, जि. रायगड**

-------- (अर्जदार)

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखित २२.५% योजने अंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे **१) मे. श्रीनाथजी इंटरप्रायजेस तर्फे भागीदार अ) बाबुभाई विरजीभाई पटेल ब) श्री. बाबुभाई विरजीभाई पटेल (एच.यु.एफ.) क) श्री. नितीन बाबुभाई गाजीपारा (एच.यु.एफ) ड) श्री. प्रशांत बाबुभाई गाजीपारा इ) श्री. नितीन बाबुभाई गाजीपारा २) बालाजी कॉर्पोरेशन तर्फे भागीदार अ) श्री. बाबुभाई विरजीभाई पटेल ब) श्री. प्रशांत बाबुभाई गाजीपारा क) श्रीमती गौरीबेन दियालभाई पटेल ड) श्री. जिग्नेश राजुभाई वाघाणी इ) श्री. सुकेतु मोहनभाई पटेल ३) मे. गितांजली स्पेस प्रा. लि. तर्फे भागीदार अ) श्री. बाबुभाई विरजीभाई पटेल ब) श्री. नितीन बाबुभाई गाजीपारा** (हस्तांतरण अर्जदार) यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता "ना हरकत प्रमाणपत्रासाठी" मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करार नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| १८०७ | ०५/०७/२०२१ | पुष्पक नोड (उलवे) | २६A | २ | ६४५० | ०५.०५.२०२१ | १७/०५/२०२१ |

या सूचनेद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहित **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), ७ वा मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर "ना हरकत प्रमाणपत्र" देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**(स्वाक्षरी)**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**
सिडको/जनसंपर्क/१४१/२०२१-२२

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in


## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


## गाळा विकणे आहे

**पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.**

**संपर्क : ९३२१५९२११३/८१०४४७७४०**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## कु. धनश्री धनराज विसपुते हिला मास्टर ऑफ सायन्स पदवी बहाल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई सुवर्णकार मंडळाचे माजी अध्यक्ष व विद्यमान कार्याध्यक्ष आणि आदर्श शैक्षणिक समुहाचे चेअरमन धनराजजी विसपुते तथा नवी मुंबई सुवर्णकार महिला मंडळाच्या विद्यमान अध्यक्षा व आदर्श शैक्षणिक समुहाच्या सचिव सौ.संगिताताई धनराज विसपुते यांची सुकन्या कु. धनश्री धनराज विसपुते हिने अमेरिकेतील नॉर्थ ईस्टर्न विद्यापिठ, बोस्टन येथील एम. एस.(मास्टर ऑफ सायन्स) ही पदवी नुकतीच प्राप्त केली आहे.

या सुवर्ण कन्येने यशाचे शिखर गाठल्यामुळे आपल्या आई वडीलांचे स्वप्न साकार केले आहे.या यशाबद्दल नातेवाईक, आप्तेष्ट, नवी मुंबई सुवर्णकार मंडळाचे पदाधिकारी, आदर्श शैक्षणिक समुहाचे कर्मचारी यांचेकडून समाजस्तरावर तीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

कु.धनश्रीच्या यशा प्रित्यर्थ आदर्श शैक्षणिक समुहातर्फे पर्यावरणाचा वसा हे ध्येय ठेवून वृक्षारोपण तसेच वृक्षसंगोपनचा वसा घेऊन पर्यावरण संरक्षण व संवर्धन करु आणि सामाजिक वारसा जपू! असा निर्धार केला असून वर्षा ऋतुत आदर्श शैक्षणिक समुहातर्फे वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. अशी माहीती सुत्रांकडुन देण्यात आली

## बेकायदेशीररित्या जुगार खेळणाऱ्यांवर गुन्हे शाखा कक्ष-२ पनवेलची कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील विठ्ठलवाडी चिंचपाडा याठिकाणी काही इसम हे ५२ पत्त्यांचा अंदर बाहर नावाचा जुगाराचा खेळ सार्वजनिक ठिकाणी पैसे लावून खेळत असल्याची माहिती गुन्हे शाखा कक्ष-२ पनवेलचे वपोनि गिरीधर गोरे यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि जी.व्ही. कराड, पोउपनिरीक्षक वैभव रोंगे, सपोनि शिवाजी हुलगे, पोहवा ज्ञानेश्वर वाघ व पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून चार जणांना रोख रकमेसह ताब्यात घेतले आहे व त्यांच्या विरूद्ध कारवाई केली आहे.

# शासनाच्या नियमांच्या पालनासह पर्यटकांची माथेरानला पसंती

**दै.रायगड नगरी । माथेरान**




नुकताच २६ जून पासून माथेरान मध्ये पर्यटकांना प्रवेश देण्यात आल्यावर शासनाच्या नियमांचे पालन करत मास्क परिधान करून पर्यटकांनी माथेरानला पसंती दिली आहे.गा-वात अंतर्गत पॉईंट्स फिरण्यासाठी अस्तित्वात असणारी वाहतूक व्यवस्था वगळता इथे राहण्याची व्यवस्था ही खूपच स्वस्त असल्याने अनेकजण एक दिवसीय पॉईंट्सचे पर्यटन करून मुक्काम करीत आहेत.दोन महिने लॉक डाऊनच्या खडतर वाटचाली मधून पर्यटकांना प्रवेश दिल्यामुळे स्थानिकांना दिलासा मिळाला आहे.मिनिट्रेनच्या शटल सेवेच्या फेऱ्यात सुध्दा वाढ करण्यात आली आहे त्यामुळे अमन लॉज रेल्वे स्टेशन वरून गावात येण्यासाठी अगदी स्वस्त दरात प्रवासाची सोय उपलब्ध आहे त्यामुळे शनिवारी आणि रविवारी इथे मोठया प्रमाणावर गर्दी पहावयास मिळते. पर्यटक सुध्दा कोव्हीडचे नियम पाळत आहेत. मास्क परिधान करूनच इथल्या नैसर्गिक सौंदर्याचा मनमुराद आनंद लुटताना दिसत आहेत.नगरपरिषदेच्या वतीने त्याचप्रमाणे पोलीस प्रशासनाने सुध्दा विना मास्क आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर बारकाईने लक्ष केंद्रित केले आहे. तर नगरपरिषदेच्या कर्मचारी वर्गाकडून सुध्दा येणाऱ्या पर्यटकांना नियमांचे पालन करण्याबाबतीत जनजागृती साठी दवंडी दिली जात आहे.विना मास्क आढळून आल्यास ५०० रुपयांचा दंड वसूल केला जात आहे. त्यामुळे इथे येणाऱ्या पर्यटकांसह स्थानिक नागरिक, व्यावसायिक, दुकानदार, स्टॉल धारक,हातरीक्षा चालक, अश्वपाल सुध्दा नियमाने वागत आहेत. इथे कोरोना रुग्णांच्या संख्येचे प्रमाण सुध्दा नगण्य आहे.माथेरानचे संपूर्ण जनजीवन हे केवळ पर्यटनावर अवलंबून आहे त्यामुळे निदान या स्थळासाठी अन येणाऱ्या पर्यटकांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होऊ नये यासाठी सकाळी सात ते सांयकाळी आठ वाजेपर्यंत दुकाने उघडी ठेवण्यास परवानगी मिळावी अशी मागणी व्यापारी वर्गासह स्थानिकांमधून होत आहे.

> लॉक डाऊन नंतर विशेष बाब म्हणून माथेरानला अनलॉकची सूट मिळाली आहे. आणि अनायास जिल्हाधिकारी आपल्या माथेरानला आल्या त्यातून त्यांना परिस्थितीची जाणीव करून दिली असता त्यांनी माथेरान व्यवसायिक यांना शनिवार व रविवारची दुकान उघडे ठेवायची सूट दिली आहे. माथेरानकराना जर दुकाने जास्त वेळ उघडी ठेवण्याची मुभा मिळाली तर ग्राहकांना आकर्षित करून आपल्या व्यवसायाला चालना देता येईल व गर्दी न करता प्रत्येक ग्राहकाला माल देता येईल.
>
> **ज्ञानेश्वर बागडे, व्यावसायिक माथेरान**

# जिल्हा प्रशासन म्हणते पन्नास टक्के क्षमतेने हॉटेल, रिसॉर्ट सुरु करा, मात्र स्थानिक प्रशासनाकडून वीकेंड लॉकडाऊन

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन तालुक्यात आता कोरोना बाधित रुग्णांची संख्या कमी होऊ लागली आहे. रुग्ण बरे होण्याचे प्रमाण देखील खूप चांगले आहे. रायगड जिल्हा चौथ्या स्तरावरती जाताना रायगडच्या जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी पन्नास टक्के क्षमतेने हॉटेल्स, रिसॉर्टस् व रेस्टॉरंट सुरू करण्यासाठी परवानगी दिलेली आहे. विशेषतः श्रीवर्धन तालुक्यात व कोकणात पर्यटक हे शनिवार व रविवार या दोनच दिवशी येत असतात. जिल्हा प्रशासनाकडून पन्नास टक्के क्षमतेने हॉटेल, रिसॉर्ट चालू करण्यासाठी परवानगी दिलेली असताना, स्थानिक प्रशासनाने मात्र विकेंड लॉकडाऊन जाहीर करून श्रीवर्धन मधील पर्यटन व्यावसायिकांचे तीन तेरा वाजवून टाकले आहेत.

शनिवारी दुपारी बारा वाजता संपूर्ण बाज-ारपेठ पोलिसांनी बंद केली होती व श्रीवर्धन मध्ये येणाऱ्या पर्यटकांना देखील आत मध्ये पाठवले जात नव्हते. अगोदरच मागील चार महिन्यांपासून व्यवसाय बंद असल्यामुळे कंबरडे मोडलेल्या पर्यटन व्यावसायिकांना आता या प्रकाराच्या विरोधात आंदोलन छेडल्या शिवाय पर्यायच राहणार नाहीये. जरी बाजारपेठ बंद केली तरी काही मिठाई दुकानदार, भाजी दुकानदार बिनधास्त पणे आपले दुकान उघडे ठेवत असतात. यातील एक मिठाई दुकानदार पोलिसांना चहा आणि नाष्टा पुरवत असल्यामुळे त्याचे दुकान उघडे असते. अशी चर्चा नागरिकांमधून होत असल्याचे पहायला मिळत आहे.जर बाजारपेठ बंद तर सर्वांसाठी असावी, प्रशासनाकडून भेदभाव का?असे अनेक व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. प्रशासनातील सावळ्या गोंधळामुळे असे प्रकार घडत असल्याचे नेहमीच दिसून येत आहे. राज्य शासनाची भूमिका एक असते. जिल्हा प्रशासनाची भूमिका अजून वेगळी असते. तर स्थानिक प्रशासनाची भूमिका अजून वेगळी असते. जनतेने नक्की कोणाचे ऐकायचे हाच प्रश्न आता लोकांसमोर उभा राहिला आहे. कोकणामध्ये तसेच श्रीवर्धन तालुक्यात सर्वात जास्त पर्यटक मार्च एप्रिल मे व जून या महिन्यांमध्ये येत असतात. मात्र या सर्व महिन्यांमध्ये कडक निर्बंध लागू करून लॉकडाउन केल्यामुळे पर्यटन व्यवसाय पूर्णपणे बंद झाला होता. पर्यटन व्यावसायिकां सोबत पर्यटन व्यवसायाशी निगडित असणारे इतर घटक हे देखील या लॉकडाऊन मुळे त्रस्त झाले आहेत. जर प्रशासनाला अशाच प्रकारचा गोंधळ वारंवार घालायचा असेल तर पर्यटन व्यावसायिक व पर्यटन व्यवसायाची निगडित असणाऱ्या घटकांना मोफत मिळणारी शिवभोजन थाळी प्रशास-नातर्फे रोज देण्यात यावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. ज्याप्रमाणे बैलगाडी चालवणारा चालक बैल जोराने पळावेत यासाठी बैलाला फटका मारतो व समोर काही आल्यानंतर लगेच कासरे जोरात ओढून बैलगाडी थांबवतो. तशी अवस्था सध्या पर्यटन व्यावसायिकांसोबत सर्वच व्यावसायिकांची झाली आहे. पर्यटन व्यवसायीकां सोबत चाललेल्या या प्रकाराबाबत श्रीवर्धनच्या आमदार व रायगडच्या पालकमंत्री तसेच पर्यटन राज्यमंत्री आदिती तटकरे यांनी प्रशासनाकडे सखोल माहिती घेऊन पर्यटन व्यावसायिकांना योग्य तो न्याय द्यावा. अशी मागणी पर्यटन व्यावसायिकां मधून केली जात आहे.

## टेम्पो-इर्टीगा धडक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा गाव हद्दीतील पनवेल-मुंब्रा रोडवर आयशर टेंपो गाडीने इर्टिगा गाडीस ठोकर दिल्याने झालेल्या अपघातात इर्टिगा गाडीचे मोठे नुकसान झाले आहे.

आयशर टेंपो क्र.-एमएच ४३ बीजे ९५३८ वरील चालक जितू तुतीलाल लोदी राजपूत (वय-३५) हा पनवेल-मुंब्रा रोडवर तळोजा गाव येथून जात असताना योगेश मढवी यांच्या उभ्या असलेल्या इर्टिगा गाडीस ठोकर मारून झालेल्या अपघातात त्यांच्या गाडीचे मोठे नुकसान झाले आहे. याबाबतची तक्रार तळ-ोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# मुरुडमध्ये कोरोना लसीकरण करण्याआधी अँटीजेन चाचणी करण्याचा निर्णय रद्द

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्हिडीओ कॉन्फरन्स द्वारे दि. ७/७/२०२१ रोजी दिलेल्या सूचनेनुसार रायगडच्या जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी कोरोनाची लस घेण्याआधी लाभार्थींची अँटीजेन टेस्ट करण्याचे आदेश दिले होते. परंतु शासनाने सदरचा निर्णय रद्द केला असून दि. १०/०७/२०२१ रोजी दूरध्वनीवरून संचालिका डॉ अर्चना पाटील यांनी १८ते ४५ व त्यावरील वयोगटातील लाभार्थींची कोरोना लस घेण्याआधी अँटीजेन टेस्ट करण्यात येऊ नये सदरचा निर्णय रद्द करण्यात आल्याचे जाहीर केले. त्यानुसार रायगड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने यांनी सुधारित पत्राद्वारे मुरुड ग्रामीण रुग्णालयात कळविले आहे. सुरवातीच्या अँटीजेन टेस्ट करण्याच्या निर्णयाने नागरिकांमध्ये भीतीचे व नाराजीचे सूर उमटत होते. त्यामुळे लसीकरण नोंदणी करणाऱ्यांची संख्याही घटली परंतु नवीन सुधारित आदेशाचे नागरिकांनी स्वागत केले आहे. सोमवारसाठी कोविशिल्ड वॅक्सिंग चे १०० डोस व कोव्याकसीन चे ६ च डोस शिल्लक असल्याचे लसीकरण केंद्रातून कळले आहे, ते डोस फकत दुसरा डोस घेणाऱ्या लाभार्थींसाठीच वापरता येतील. जिल्हा आरोग्यकेंद्रातून पुढील डोस उपलब्ध झाल्यानंतर पहिल्या डोस घेणाऱ्या लाभार्थींना देता येईल. तसेच लसीकरणासाठी आलेल्या लाभार्थींमध्ये कोरोनाची सौम्य लक्षणे आढळल्यास त्यांना आरएटी/आरटीपीसिआर टेस्ट जवळच्या आरोग्य केंद्रात जाऊन करण्याचा सल्ला घ्यावा असे रायगड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ सुहास माने यांनी पत्राद्वारे कळविल्याचे ग्रामिण रुग्णालयातून सांगण्यात आले.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली शेत जमीन मिळकत ही खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसूल दप्तरी नावे असून ती त्यांचे खुद्द, ताबा, कब्जा मालकी, वहिवाटीतील आहे. त्या शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे : महोदर, ता.पनवेल, जि.रायगड, तलाठी सजा-महोदर हद्दीतील**

| मालकाचे नाव | गट/भूमापन क्रं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे | भोगवटादार वर्ग-१ |
|---|---|---|---|---|
| इक्बाल अहमद देदरानी | ८० | ०-६४-२०<br>एकूण ०-६४-२०<br>व पो.ख.०-०५-१०<br>एकूण ०-६९-३० | ४-४७ | |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमीन मालक यांच्याशी खरेदी व्यवहार ठरविला असून वरील मिळकतींवर अन्य कोणाचा दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिएन, चार्ज, ॲटेचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, कुळवहिवाट, ताबा, कब्जा वहिवाट, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, जप्ती, मॉरगेज, संपादन, रिझर्व्हेशन, रेक्वीझिशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध तसेच एकत्र कुटुंब मिळकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रत्यक्ष भेटून मुदतीमध्ये हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती मुदतीत दाखल न केल्या गेल्यास सदरच्या वरील जमीन मालकांशी खरेदीखताच्या व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

हे कळावे,
दि.१२/०७/२०२१
ठिकाण : कळंबोली

**सही/-**
**ॲड.सुनील एन. मोरे**
**ऑफिस नं.३०६०, सी-विंग,**
**बिमा कॉम्प्लेक्स प्रिमायसेस,**
**प्लॉट नं.११९, सेक्टर-के.डब्ल्यू सी**
**कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१८**
**मो.नं.८३६९४६५७९९/९९२०४५५७२७**

मा.मुजावर साहेब कोर्ट
अर्जदारांचे वकील ॲड.एकनाथ जी. खुटले

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. २ रे सहदिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.५८१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२७/०८/२१

श्री.महादा उर्फ महादेव सिताराम वाघे
वय : ४४ वर्षे, धंदा : मोलमजूरी
रा.आदिवासीवाडी (कोल्ही),
पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

१) निर्मला सिताराम वाघे उर्फ
सौ.निर्मला जयदास कातकरी
वय : ४० वर्षे, धंदा : गृहिणी
२) कांता सितराम वाघे उर्फ
सौ.कांता काळुराम कातकरी
वय : ३५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.आदिवासीवाडी चेरीवली, पो.वाजे,
ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.मंदा सितराम वाघे उर्फ
सौ.मंदा मारुती कातकरी
वय : ३२ वर्षे, धंदा : गृहिणी
क्र.१ व ३ रा.आदिवासीवाडी वाजे,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.सितराम चंदर वाघे हे दि.३१/१२/२०१२ रोजी आदिवासी वाडी (कोल्ही), ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. कै.सितराम चंदर वाघे व अन्य हिस्सेदारांचे लाभांत खालील वर्णनाचा भूखंडा इरादीत झालेला आहे.

**भूखंड क्र.६ ए, सेक्टर क्र.१६, नवीन पनवेल (प.), क्षेत्र ५००० चौ.मीटर**

अर्जदार हे कै.सितराम चंदर वाघे यांचे, कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.९/०७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मे.मुजावर साहेब
अर्जदारातर्फे वकील
सौ.सारिका शेगट / लबडे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.७०१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१३/०८/२१

१) श्री.अण्णा कृष्णा कोंडीलकर
वय : ५५ वर्षे, धंदा : नोकरी / शेती
२) श्री.काशिनाथ कृष्णा कोंडीलकर
वय : ५७ वर्षे, धंदा : नोकरी / शेती
३) श्री.अनंत कृष्णा कोंडीलकर
वय : ३७ वर्षे, धंदा : नोकरी / शेती
४) श्रीमती.लक्ष्मी कृष्णा कोंडीलकर
वय : ७० वर्षे, धंदा : वयोवृद्ध
१ ते ४ सर्व रा.मु.कासप, पो.आपटा,
ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.संजना संजय गोंधळी
वय : ४१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.गोंधळी निवास, गणेश नगर, टी.सी.आई ऑफिस जवळ,
रिस, ता.खालापूर, जि.रायगड — अर्जदार

अर्ज मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदीनुसार वारस दाखला मिळणेकरिता...

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

१) ज्याअर्थी कै.कृष्णा बाळु कोंडीलकर हे दि.२६/०३/२०१९ रोजी मरण पावले असून कै.कृष्णा बाळु कोंडीलकर यांच्या मालकीच्या पुढीलप्रमाणे वर्णनाच्या मिळकती महाराष्ट्र इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट ॲक्ट १९६१ च्या तरतुदींप्रमाणे पाताळगंगा एम.आय.डी.सी. करिता ॲक्वीझिशन केस नं. LAQ/SR-11/16/86 अन्वये संपादीत करण्यात आल्या आहेत.

**संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : कासप, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र ए.गुं.आणा. | नुकसान भरपाईची एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ३२ | ० | ०-२४-० | |
| २ | ३५ | ० | १-४६-२ | १,१७,६१७=९० |

आता सदर संपादीत मिळकतीच्या संपादनापोटी एम.आय.डी.सी. सदर मयत कृष्णा बाळु कोंडीलकर यांस वरील मिळकतीचे संपादनापोटी मिळणारा भूखंड सदर अर्जदारांस मिळणेकरिता त्यांनी ते मयत कृष्णा बाळु कोंडीलकर यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणी प्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने / इसमांनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.०१ माहे ०७/२०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

अर्जदारातर्फे वकील
सौ.सारिका शेगट / लबडे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.६७०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१३/०८/२१

१) श्री.धनाजी बाळाराम माळी
वय : ४६ वर्षे, धंदा : नोकरी / शेती
२) श्री.जयवंत बाळाराम माळी
वय : ४८ वर्षे, धंदा : नोकरी / शेती
३) श्री.कृष्णा बाळाराम माळी
वय : ३९ वर्षे, धंदा : नोकरी / शेती
४) इंदू बाळाराम माळी
वय : ५५ वर्षे, धंदा : गृहिणी
१ ते ४ सर्व रा.मु.कासप, पो.आपटे,
ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.संजना संजय म्हात्रे
रा.मु.पो.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

अर्ज मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदीनुसार वारस दाखला मिळणेकरिता...

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

१) ज्याअर्थी कै.बाळाराम सहदेव माळी हे दि.११/०६/२००५ रोजी मरण पावले असून त्यांची पहिली पत्नी व अर्जदार नं.१ ते ३ व ५ ची आई यमुना बाळाराम माळी ही दि.०७/०३/१९८८ रोजी मरण पावली आहे व ज्याअर्थी सदर मयत बाळाराम सहदेव माळी यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीची पुढीलप्रमाणे मिळकत महाराष्ट्र इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट ॲक्ट १९६१ च्या तरतुदींप्रमाणे पाताळगंगा एम.आय.डी.सी. करिता ॲक्वीझिशन केस नं. LAQ/SR-1/22/26 अन्वये संपादीत करण्यात आल्या आहेत.

**संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : कासप, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र ए.गुं.आणा. | नुकसान भरपाईची एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | १८ पै | - | ०-८-० | |
| २ | ४१ | १ | ०-३७-५ | |
| ३ | ४१ | ५ | ०-२८-१ | ५२,९७७/- |

आता सदर संपादीत मिळकतीच्या संपादनापोटी एम.आय.डी.सी. सदर मयत बाळाराम सहदेव माळी यांस वरील मिळकतीचे संपादनापोटी मिळणारा भूखंड सदर अर्जदारांस मिळणेकरिता त्यांनी ते मयत बाळाराम सहदेव माळी यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणी प्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने / इसमांनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.०२ माहे ०७/२०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.मुजावर साहेब कोर्ट
ॲड.राजेश बांगर, पनवेल
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.७८७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१२/०८/२१

१) श्रीमती.जुबेदा हाजीमिया पटेल
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.इरफान हाजीमिया पटेल
वय : वर्षे, धंदा : शेती
३) श्री.मजीद हाजीमिया पटेल
वय : वर्षे, धंदा : शेती
सर्व रा.तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांची मुलगी व अर्जदार क्र.२ ते ३ यांची बहिण पै.शहनाज हाजिमिया पटेल या दि.१३/०५/२०२१ रोजी अविवाहित पैगंबरवासी झालेल्या आहेत. श्रीमती.जुबेदा हाजीमिया पटेल वगैरे ह्यांनी पै.शहनाज हाजिमिया पटेल यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी वारसापत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. पै.शहनाज हाजिमिया पटेल यांचे पुर्वगामी कै.अब्दुल लतीफ कमरुद्दीन पटेल यांच्या नावे असलेल्या जमीन मिळकती ह्या नवी मुंबई प्रकल्पाकरिता भूसंपादनात झालेल्या होत्या व आहेत. सदरील भूसंपादीत जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | युनिट केस क्रं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | ओवे-४५९ | ४१२ | ० | १०-२८-० |
| २ | ओवे-४५९ | ३९९ | ४ | ०-०५-० |
| ३ | | ४०४ | १ अ | ०-२१-० |
| ४ | | ४०४ | ९ | ०-०३-१२ |
| ५ | | ४०४ | १० | ०-०२-४ |
| ६ | | ४०५ | १ | ०-१९-८ |
| ७ | | ४०६ | १ | ०-०२-० |
| ८ | | ४०७ | ० | १-१६-० |
| ९ | | ४०९ | २ | ०-२३-८ |
| १० | | ४०९ | ३ | ०-०१-० |
| ११ | | ४०९ | ५ | ०-०४-८ |
| १२ | | ४०९ | ६ | २-०९-० |
| १३ | | ४११ | ० | १-०७-१२ |
| १४ | | ४१३ | २ | ०-११-८ |
| १५ | | ४१४ | ० | ०-१९-० |
| १६ | | ४१५ | १ | ०-००-१२ |
| १७ | | ४१६ | २ | ०-०४-८ |
| १८ | | ४१६ | ६ | ०-०२-४ |
| १९ | | ४१७ | १ | ०-१६-८ |
| २० | | ४१७ | ९ | ०-०६-८ |
| २१ | | ४२१ | ७ | ०-०५-४ |
| २२ | | ४२३ | ६ | ०-२१-४ |
| २३ | | ४२४ | ७ | ०-१२-१२ |
| २४ | | ४२४ | ८ | ०-०५-४ |
| २५ | | ४२४ | ९ | ०-०३-१२ |
| २६ | | ४२७ | ४ | ०-०६-१२ |
| २७ | | ४३० | ८ | ०-०४-१२ |
| २८ | | ४३३ | ० | १-१९-० |
| २९ | | ४३४ | १ | २-०९-१२ |
| ३० | | ४३६ | अ | ४-०६-० |
| ३१ | | ४०८ | ० | ३-१९-० |
| ३२ | | ४१६ | ९ | १-२५-४ |
| ३३ | | ४२० | ० | १-१९-० |
| ३४ | | ४४८ | ० | ०-२३-४ |

वर श्रीमती.जुबेदा हाजीमिया पटेल वगैरे हे पै.शहनाज हाजिमिया पटेल यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.जुबेदा हाजीमिया पटेल वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर पै.शहनाज हाजिमिया पटेल यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१० जुलै २०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## वेश्या व्यवसाय करणाऱ्याविरूद्ध गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे वसाहतीमध्ये बेकायदेशीररित्या वेश्या व्यवसाय सुरू असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक स्मिता जाधव यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने छापा टाकून कारवाई केली आहे.

कामोठे वसाहतीमध्ये से.-३६ अक्षर बिल्डींग जवळ यातील आरोपी हे संगनमत करून एका २६ वर्षीय पिडीत महिलेशी संपर्क करून तिला वैश्या गमनासाठी येथे बोल-ावून तिच्याकडून वेश्या व्यवसाय करून घेऊन त्याबाबतचा मोबदला स्विकारून पीडितेच्या कमाईवर उपजीविका भागवत असल्याची माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी बोगस गिऱ्हाईक पाठवून त्यानंतर त्याठिकाणी विशेष पथकाने छापा टाकून मारूती स्विफ्ट गाडी, मोबाईल फोन, रोखरक्कम व इतर ऐवज असा मिळून जवळपास २,५४,००० चा ऐवज हस्तगत केला आहे. याबाबत दोघांविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## तळोजा येथून रिक्षेची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा परिसरात उभी करून ठेवलेली काळ्या पिवळ्या रंगाची बजाज कंपनीची रिक्षा चोरी झाल्याची घटना घडली आहे.

झहिर बशीर शेख यांनी त्यांची १ लाख १० हजारांची काळ्या पिवळ्या रंगाची बजाज कंपनीची रिक्षा क्र.- एमएच ४६ बीडी १११६ हि चांद किराणा दुकानासमोर मस्जिद युनिसच्या बाजूला तळोजा येथे उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी हि रिक्षा चोरल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## शेतकरी संघटनेच्या मुरुड, अलिबाग कार्यकारिणीसाठी आवाहन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

शेतकऱ्यांच्या मालाला हमी भाव मिळावा, ज्येष्ठ शेतकऱ्यांना पेन्शन योजना लागू करण्यात यावी, शेतीसाठी व शेतीपूरक व्यवसायासाठी चार टक्के दराने कर्जपुरवठा करण्यात यावा. आदी.विविध मागण्यांसाठी रायगड जिल्हा शेतकरी संघटनेच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात येत असून संघटनेची मुरुड व अलिबाग तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात येत असून यासाठी तालुक्यातील शेतकऱ्यांनी सहकार्य करण्याचे आवाहन शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष हरिश्चंद्र शिंदे यांनी केले आहे.

रायगड मधील शेतकऱ्यांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी तालुका पातळीवर कार्यकारिणी जाहीर करण्यात येत असून आतापर्यंत रोहा, पेण, सुधागड, पाली, खोपोली, कर्जत, महाड, माणगांव, श्रीवर्धन व म्हसळा तालुक्यात कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.लवकरच मुरुड व अलिबाग तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात येणार आहे.

तरी अधिक माहितीसाठी संघटनेचे कार्यकर्ते प्रमोद पाटील मोबाईल नंबर ९१६७११३०१७ व ९९२३४३४१४४ या नंबरवर संपर्क साधावा असे कळविण्यात आले आहे.

# विंधणे तलावात मृत माशांचा खच ; मत्स्य पालनकर्त्यांचे लाखोंचे नुकसान

**दै.रायगड नगरी । उरण**



दिवसेंदिवस वातावरणातील होणाऱ्या बदलामुळे उरण तालुक्यातील विंधणे येथील मत्स्यशेती करणाऱ्या शेतकऱ्याच्या तलावातील दीड ते दोन टनापेक्षा अधिक वजनाचे मासळीचा खच मारून पडल्याने मत्स्य शेती पालन व्यवसायीकाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून,या मत्स्यव्यवसायीकावर मोठे संकट कोसळले आहे.

त्यामुळे अतिशय मेहेनतीने मत्स्यव्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्याचे मोठे नुकसान परिसरात त्याची खबर मिळताच अनेकांनी येथील विविध प्रकारचे मोठमोठे मासे पाहण्यासाठी गर्दी केली होती. विंधणे येथील मत्स्य व्यवसायिक गजानन पाटील हे आपला उदरनिर्वाह चालविण्यासाठीसाठी मागील आठरा वर्षे गाव तलावात मत्स्य शेतीचा व्यवसाय करीत आहेत. आठरा वर्षात अनेक वेळा व्यवसायात चढ उतार आले आहे. परंतु दिवसेंदिवस वातावरणात होणाऱ्या बदलामुळे तलावातील पाण्यावर त्याचा परिणाम होऊन ऑक्सिजनचे प्रमाण कमी होऊन त्यामुळे तलावातील मासे, कटला, जिताडी, ऑक्सिजनच्या अभावी मृत्युमुखी पडून पाण्यावर येऊन तरंगू लागली शेतकऱ्यांनी यांत्रिक पंप लाऊन, ऑक्सिजन देण्याचा प्रयत्न ही केला. परंतु तलावाचा भाग पाच एकर पर्यंत मोठा असल्यामुळे त्याचा काही उपयोग झाला नाही. या तलावात दीड ते दोन टनापेक्षा अधिक मासे कटला, ब्रिगेड, जिताडा, सायप्रनिस, तिलापिया अशा प्रकारच्या महागड्या जा-तीचे मासे मृत्युमुखी पडले आहेत. त्यामुळे या शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. अशा शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी शासनाने मदतीचा हात दयावा अशी भावना येथील मत्स्य शेतकरी व्यक्त करीत आहेत. मोठे आर्थिक नुकसान झाल्याने या शेत तलाव पालन करणाऱ्या शेतकऱ्याच्या कुटुंबियांवर पुरती उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे.

## तोक्ते वादळ ग्रस्तांना शासनाकडून वाटण्याच्या अक्षता ; वादळग्रस्त अद्याप मदतीपासून वंचितच

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

१६ व १७ मे या दोन दिवशी कोकण किनारपट्टीला तोक्ते चक्रीवादळाने चांगलेच झोडपून काढले होते. या वादळामध्ये विशेषता: केळीची झाडे, त्याचप्रमाणे फळझाडांची झाडे व गुरांचे गोठे तर काही कच्ची घरे यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.तोक्ते चक्रीवादळ हे कोकण किनारपट्टीच्या अंदाजे शंभर ते दीडशे किलोमीटर जवळून गुजरातच्या दिशेने वाहत जात होते. परंतु वादळाने संपूर्ण कोकण किनारपट्टीला आपला झटका दाखवला होता. मागील वर्षी तीन जून रोजी आलेल्या निसर्ग चक्रीवादळा एवढे महासंहारक हे वादळ नसले तरीही या वाद-ळाचा वेग देखील चांगलाच असल्याने कोकण किनारपट्टीवर अनेक ठिकाणी नुकसान झाले आहे. निसर्ग चक्रीवादळ श्रीवर्धन व हरिहरेश्वरच्या समुद्रकिनाऱ्यावर धडकल्याने याचा सगळ्यात मोठा फटका श्रीवर्धन तालुक्याला सोसावा ला-गला होता. परंतु वादळ होऊन दोन महिने होत आले तरीही शासनाकडून कोणतीही मदत अद्याप वादळग्रस्तना देण्यात आलेली नाही. वादळानंतर राज्याचे आपत्ती निवारण, मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार, रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांनी श्रीवर्धन तालुक्यात येऊन वादळग्रस्त भागाची पाहणी केली होती. त्यानंतर श्रीवर्धन प्रांत कार्यालयाच्या सभागृहामध्ये आढावा बैठक घेऊन सर्व उपस्थित अधिकाऱ्यांना नुकसान ग्रसतांचे तातडीने पंचनामे करून ते शासनाकडे सादर करावेत अशा सूचना केल्या होत्या. जेणेकरून नुकसानग्रस्तांना लवकरात लवकर मदत उपलब्ध होईल. त्यानंतर रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी देखील श्रीवर्धन तालुक्याचा दौरा केला होता. मात्र दोन महिने होत आले तरीही अद्याप कोणत्याही प्रकारची मदत एक काही वादळग्रसताला मिळाली नसल्यामुळे, महाराष्ट्र शासनाने वादळ ग्रस्तांना वाटाण्याच्या अक्षता दिल्या. असेच म्हणायची वेळ आली आहे. कोरोना महामारीमुळे सतत होणारा लॉकडाऊन, त्याचप्रमाणे नुकसानात असलेले धंदे असे असतानाही शासनाकडून वेळेवर मदत मिळत नसल्यामुळे वादळग्रस्तनमधून नाराजी व्यक्त होत आहे. तरी या वादळग्रस्तानकडे रायगडचे खासदार सुनील तटकरे व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे लवकरात लवकर लक्ष देतील का असा प्रश्न वादळग्रस्त नागरिकांमधुन उपस्थित केला जात आहे.

## प्रधानमंत्री आवास योजनेच्या नियोजित प्रकल्पाला सर्वतोपरी सहकार्य : आ.भरत गोगावले

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गालगत पोलादपूर नगरपंचायत हद्दीतील पार्टेकोंड भागात ७२० सदनिकांचा प्रकल्प प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत उभारण्यात येणार असल्याने गरीबांसाठीच्या या नियोजित प्रकल्पासाठी सर्वतोपरी सहकार्य करू, अशी ग्वाही महाड विधानसभा मतदार संघाचे आ.भरत गोगावले यांनी दिली.

लोहारे येथे आयोजित एका पत्रकार परिषदेमध्ये आ.गोगावले बोलत होते. याप्रसंगी राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, प्रकल्पाचे प्रमुख संचालक हनुमंत सावंत, रामदास कळंबे आणि संदीप पालकर, नायब तहसिलदार शरद आडमुठे, निवडणूक नायब तहसिलदार समीर देसाई, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, नगरपंचायतीचे करनिरिक्षक महादेव सरंबळे आदी उपस्थित होते.

यावेळी प्रारंभी रामदास कळंबे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. यावेळी संचालक हनुमंत सावंत यांनी योजनेची माहिती देऊन साधारणत: साडेआठ लाखांमध्ये लाभार्थ्यांना स्वत:च्या मालकीचे घर केवळ दोन वर्षांमध्ये मिळणार असून दरमहा ५ हजार रूपये कर्जाचा हप्ता असलेल्या या कर्जप्रकरणात २ लाख ६७ लाख रूपये अनुदान असून केंद्र व राज्य सरकार यांचे अनुक्रमे ४० व ६० टक्के अनुदानाचा भार उचलणार आहेत, अशी माहिती दिली. यावेळी राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे यांनी, या योजनेची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने होणार असल्याने देशातील कोणीही लाभार्थी या प्रकल्पाचा लाभ घेऊ शकणार असल्याचे सांगून



या योजनेचे ऑफलाईन अर्ज नगरपंचायत तसेच नरवीर ग्रुपच्या कार्यालयामध्ये उपलब्ध होणार असल्याने लाभार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी सुरू होण्यापूर्वीच ऑफलाईन नोंदणी करीत आपल्या सदनिकेची नोंदणी करण्याचे आवाहन केले. यावेळी पत्रकारांच्या विविध प्रश्नांना आ.गोगावले, राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, हनुमंत सावंत, संदीप पालकर तसेच नगरपंचायतीचे करनिरिक्षक महादेव सरंबळे यांनी उत्तरे दिली.

## पनवेल परिसरातील चार मोटारसायकलींची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातून चार मोटारसायकलींची चोरी झाली असून त्यात तीन तळोजा परिसरातून तर एक कामोठे परिसरातून चोरीस गेलेल्या आहेत.

गंगाधर शेट्टी यांची ३० हजारांची हिरो ग्लॅमर कंपनीची काळ्या व निळ्या रंगाची मोटारसायकल क्र-एमएच ४६ बीजे ३०७४ हि देवीचा पाडा पूनम कलेक्शन दुकानाजवळ उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली आहे. त्याचप्रमाणे विकास कांबळे यांची १५ हजारांची होडा सीबी शाईन कंपनीची काळ्या रंगाची मोटारसायकल क्र-एमएच ०४ जेएल ९५१४ हि तळोजा औद्योगिक वसाहत डाऊ केमिकल कंपनी येथे उभी केली असता तिची चोरी झाली आहे. तर सचिन हुंबे यांची ५० हजारांची यामाहा कंपनीची एफझेड ग्रे रंगाची मोटारसायकल क्र-एमएच ४६ बीजे ५१४६ हि बाळकृष्ण यांची चाळ देवीचा पाडा येथे उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली आहे. याबाबतची तक्रार तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. तर विभोर देठे यांची ४५ हजारांची होंडा कंपनीची एक्टीव्हा ३जी ग्रे रंगाची क्र-एमएच ४६ एएन ५८३४ हि एमजीएम हॉस्पिटल येथील पार्कींगमध्ये उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी चोरल्याने याबाबतची तक्रार कामोठे पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.


## ग्रुप ग्रामपंचायत चिखले

ता.पनवेल, जि.रायगड

### निवीदा सूचना सन-२०२१/२०२२

दि.११/०७/२०२१

प्रति,

अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रुप ग्रामपंचायत चिखले हद्दीतील खालील विकासकामे करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामंपचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि.१२/०७/२०२१ ते १९/०७/२०२१ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि.१९/०७/२०२१ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ४ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रुप ग्रामपंचायत चिखले यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. इसारा रक्कम अंतिम देयकातून कापून घेतली जाईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम १% | सुरक्षा अनामत ५% | ठेकेदारा वर्ग | निविदा किंमत | निविदा पाठविण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अतुल पाटणकर यांच्या घरापासून ते गोविंद पाटणकर यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे (ग्रामनिधी) | २,०१,४७३.०० | २०१५.०० | १००७४.०० | - | १००.०० | १९/०७/२०२१ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत |
| २ | विजया सदन सोसायटी चिखले येथील रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे (ग्रामनिधी) | २,१७,३००.०० | २१७३.०० | १०८६५.०० | - | १००.०० | |
| ३ | चिखले येथील योगेश पाटील घरापासून ते गजानन भोईर यांच्या घरापर्यंत बंदिस्त नाला काढून रस्ता कॉंक्रीटीकरण करणे (ग्रामनिधी) | २,९९,१८१.०० | २९९२.०० | १४९५९.०० | - | १००.०० | |
| ४ | ग्रामपंचायत चिखले येथे धर्मा शिर्के यांच्या घरापासून ते शांताराम पंडित यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे (पं.स.सेस निधी) | २,९०,०००.०० | २९००.०० | १४५००.०० | - | १००.०० | |
| ५ | ग्रामपंचायत चिखले अंतर्गत सांगडे गावात श्री.अनिल बाळाराम भोपी ते हनुमान मंदिर पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे (पं.स.सेस १५ वा वित्त आयोग संबंधित निधी) | २,५०,०००.०० | २५००.०० | १२५००.०० | - | १००.०० | |
| ६ | रा.जि.प. शाळा चिखले ते हनुमान मंदिर पर्यंत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे. (१५ वा वित्त आयोग ग्रा.पं.स्तर) | २,४०,००.०० | २४००.०० | १२०००.०० | - | १००.०० | |
| ७ | कामाचे नाव १ सीताराम चौधरी यांचे घरापासून ते बबन शेळके यांचे घरापर्यंत रस्ता पेव्हर ब्लॉक करणे | १२८८०२.०० | १२८८.०० | ६४४०.०० | - | १००.०० | |
| ८ | राजिप शाळा दुरुस्ती करणे रक्कम | १३००००.०० | १३००.०० | ६५००.०० | - | १००.०० | |
| ९ | विठ्ठल मंदिर सभोवताली पेव्हर ब्लॉक बसविणे | १५०७८३.०० | १५०७.०० | ७५३५.०० | - | १००.०० | |

**अटी व शर्ती :-**

१. सदरचे काम ग्रामपंचायतीने दिलेल्या मुदतीत पूर्ण करणे बंधनकारक आहे.तसे न झाल्यास दंडात्मक कारवाई करणेत येईल.
२. सदर कामाच्या निविदा परसेंटेज दराने भरावयाचे आहेत व तेच दर निविदेसाठी कायमस्वरूपी ग्राहय धरले जातील. सदर कामांचे निविदा अर्ज वरील कालावधीत कार्यालयीन वेळेत १००/- प्रति निविदा अर्ज दराने उपलब्ध आहेत. ग्रामपंचायतीच्या निविदा अर्जा व्यतिरीक्त अर्ज स्विकारला जाणार नाही. अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराची निवीदा अस्विकृत राहील.
३. मागिलेल्या सर्व कागदपत्रांचे सादरीकरण करणे आवश्यक आहे.
४. पॅनकार्डची व आयकराची झेरॉक्स प्रत / प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
५. कमीत कमी निविदा दर सादर करणा-या ठेकेदारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.
६. सदर निविदा दर सन २०२१-२०२२ करीता मंजुर राहील.
७. सदर कामाचे अंदाजपत्रक ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
८. निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही. व दिलेली तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. निविदेची किंमत ना परतावा राहील.
९. अधिकृत ठेकेदाराने निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदाराचा विचार केला जाईल.
१०. कामाच्या बिलातून नियमाप्रमाणे, ५% सुरक्षा अनामत, २.३३ % आयकर, ,०.१५% आयकरावर सरचार्ज इ.रक्कम प्रत्येक बिलातून कापली जाईल. काम सुरू करण्यापूर्वी १% कामगार विमा सरकारी चलनाद्धारे भरणा करून सदर चलनाची प्रत ग्रामपंचायत मध्ये सादर करणे बंधनकारक आहे.
११. वर्क ऑर्डर प्रमाणे मुदतीत काम पुर्ण न झाल्यास दुस-या ठेकेदाराकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणा-या नुकसानीस /खर्चास तसेच कार्यवाहीस आपणांस स्वत:जबाबदार रहावे लागेल.
१२. तांत्रिक मुल्यांकनानुसार व निधी उपल्बधतेनुसार देयके अदा केली जातील.
१३. निविदा मंजूर झाल्यास कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्याचे दिनांकापासून ५ दिवसाचे आत सुरू करणेचे बंधनकारक राहील.
१४. मंजुर काम हे ठेकेदाराने पनवेल पंचायत समिती,बांधकाम विभाग यांचेकडील तांत्रिक अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली व ग्रामपंचायतीने देखरेखीखली करावयाचे आहे.
१५. सुरक्षा अनामत रक्कम अंतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील केलेल्या कामाचा दर्जा चांगला असल्याची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत पात केली जाईल.
१६. काम पुर्ण करणे पुर्वीचा व काम सुरू झाल्यानंतरचा कामाचा फोटो सादर केल्याशिवाय अंतीम बिले दिली जाणार नाही.सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे काम करावयाचे आहे.
१७. बांधकाम पुर्ण झाल्यावर नियमाप्रमाणे कामाचे ठिकाणी ३३ चा कामाचा बोर्ड बसविणेत यावा. बोर्ड न लावल्यास अंतिम बिल मिळणार नाही. बोर्ड लावत असलेबाबतचा फोटो सादर करणे बंधन कारक आहे
१८. मंजुर काम अंदाजपत्रकाप्रमाणे करणेत यावे. कोणाचेही तोंडी सांगण्यावरून वाढीव काम केल्यास वाढीव रक्कम दिली जाणार नाही.
१९. एक किंवा सर्व निवीदा मंजूर / नामंजुर करणेचा अधिकार ग्रामपंचायत जांभिवली स्वत:कडे राखून ठेवत आहे. कृपया याची आपण नोंद घ्यावी.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत चिखले**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत चिखले**


## क्रीडा संकुलाच्या माध्यमातून दर्जेदार आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार व्हावेत : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । म्हसळा**



महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक सेवा संचलनालय पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड अंतर्गत म्हसळा तालुका सावर येथे उभारण्यात आलेल्या भव्य क्रीडा संकुलाचे उद्घाटन रायगड जिल्हा पालकमंत्री ना. आदिती तटकरे यांचे शुभ हस्ते करण्यात आले. खासदार सुनिल तटकरे यांच्या विशेष प्रयत्नाने म्हसळा नगर पंचायत सावर गावाचे हद्दीत शासनाचे रिक्त जागेत तालुका क्रीडा संकुल समिती म्हसळा द्वारे भव्य संकुल उभारण्यात आले आहे या क्रीडा संकुलाचे बांधकामासाठी एक कोटींचा निधी खर्च करण्यात आला असल्याचे सांगण्यात आले.

म्हसळा तालुका क्रीडा संकुल लोकार्पण करण्याचा योगायोग म्हणजे खासदार सुनिल तटकरे यांचा १० जुलै रोजी वाढदिवस आणि याच दिवशी म्हसळा तालुक्याचे विकासाचे शिरपेचात एक नवीन भव्य क्रीडा संकुलाची भर पडुन म्हसळा तालुक्याचे वैभवात वाढ झाली असल्याचे उदघाटन कार्यक्रमाला पालकमंत्री आदिती तटकरे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले.या कामी म्हसळा शहर व तालुक्यातील ग्रामस्थांनी केलेल्या सातत्यपूर्ण मागणी आणि सहकार्याने आपल्याला तालुक्यात चांगल्या दर्जाचे क्रीडा संकुल उभारता आले आहे या संकुलात सातत्याने वेगवेगळ्या खेळांची स्पर्धा आयोजित करून संकुलाची जोपासना ठेवता आली पाहिजे. संकुलामधुन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळाडू तयार व्हावेत अशा शुभेच्छा देताना तालुक्यातील खरसई येथील हेमंत पयेर, हेमा मेंदाडकर, गीता मेंदाडकर या खेळाडूंनी वेगवेगळ्या प्रकारच्या स्पर्धेत भाग घेत आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय पा-तळीवर आपले नाव लौकिक केले आहे. म्हसळा तालुक्यातील मैदानी खेळ खेळण्यासाठी याच क्रीडा संकुला समोर खो-खो, कबड्डी आदी खेळांचे क्रीडांगण तयार करण्यासाठी काही अवधीतच दीड कोटींचा निधी उपलब्ध करून दिला जाईल असे पालकमंत्री तटकरे यांनी आश्वाशीत केले.माझ्याकडे राज्याचा क्रीडा खाता आहे परंतु गेल्या वर्ष,दोन वर्षात कोरोना कालावधीत शासनाकडून आवश्यक तेवढा निधी क्रीडासाठी आणता आला नसला तरी आता या कामात भरारी घेतली जाईल असे सांगितले. म्हसळा तालुका क्रीडा संकुल आता जरी शहरापासुन थोडे दुर वाटत असेल तरी शहराचे विस्तार पहाता या संकुलाला राज्यात चांगला दर्जा मिळेल अशा सर्व त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. आयोजित कार्यक्रमात वूडबॉल, बॅटमिंटन, स्केटिंग आदी खेळात प्रावीण्य मिळविलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू हेमंत पयेर यांनी भाग घेऊन भारत देशाचे नाव लौकिक केल्याने त्यांचा पालकमंत्री तटकरे यांचे हस्ते गौरव करण्यात आला. या क्रीडा संकुलच्या माध्यमातून दर्जेदार आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार व्हावेत अशी आशाही पालकमंत्र्यांनी व्यक्त केली.

## अपघातग्रस्त प्रवाशांच्या मदतीसाठी धावले शिवसेना जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अपघातग्रस्त गाडीतील लोकांच्या मदतीसाठी शिवसेना जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील हे धावून गेल्याने मोठी दुर्घटना टळली आहे.

शिवसेनेचे रायगड जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील हे कर्जतवरुन पनवेल बाजूकडे येत असताना भोकरपाडा येथे टोयोटा ट्रवेरा गाडीच्या पुढे अचानकपणे दुचाकी आल्याने वाहनचालकाने अपघात होऊ नये यासाठी त्यांच्या गाडीचा अचानकपणे ब्रेक मारला. यात गाडी पलटी झाली. सदर गाडीत सोनावणे कुटूंबिय प्रवास करीत होते व ते कर्जतवरून भाईंदर येथे चालले होते. या गाडीत एकूण सात प्रवासी होते. अपघाताचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील हे आपल्या गाडीतून उतरून त्यांनी मागून येणारी वाहने थांबवली. त्याचप्रमाणे पलटी झालेल्या गाडीतील तीन लहान मुले व चार मोठी माणसे यांना प्रथम बाहेर काढून गाडी सरळ करण्यासाठी त्यांच्यासह त्यांचा चालक आदिल पठाण आणि अंगरक्षक विशाल बोरुडे व ग्रामस्थ धावले. सदर गाडी सरळ झाल्यावर आतील प्रवाशांना काही दुखापत झाली आहे का याची विचारपूस जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील यांनी केली. तसेच आवश्यक ती मदत त्यांना करून पुढील प्रवासासाठी त्यांना रवाना केले. शिवसेना ही नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असते व मदतीला प्रथम नेहमीच शिवसेना व शिवसैनिक धावत जातो याचा प्रत्यय झालेल्या घटनेत जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील यांनी दाखवून दिला आहे.